International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 40 September - October - 2025

# आदिवासी जननायक – बिरसा मुंडा

**प्राचार्य डॉ. चंद्रसेन आवारे**
*श्री. संत गजानन महाविद्यालय, खर्डा.*
*ता. जामखेड, जि. अहिल्यानगर*
*Corresponding Author – प्राचार्य डॉ. चंद्रसेन आवारे*
**DOI - 10.5281/zenodo.17663375**

आज मराठी साहित्य क्षेत्रात अनेक साहित्य प्रवाह उदयाला येत आहेत. हे विविध साहित्य प्रवाह आपल्या वेगवेगळ्या स्वरूप वैशिष्ट्यासह समृध्द व गतिमान होवू लागले आहेत. त्या पैकीच एक प्रवाह म्हणजे आदिवासी साहित्य होय. ग्रामिण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य या सर्व साहित्य प्रकाराने जशी गती घेतली तशी आदिवासी साहित्याने घेतलेली दिसत नाही. आदिवासीच्या जीवन, कला, धर्म, संस्कृती, भाषा आणि साहित्य याचा जनू विसरच पडत चालल्याचे जाणवते. आपल्या सभोवतालचे सामाजिक व वाड्मयीन कार्य आदिवासी विषयी पक्षपाती भूमिका घेत असल्याचे दिसून येते.

सुमारे चार हजार वर्षापुर्वी परकीय आर्य या देशात येण्यापुर्वी भारत देशात द्रविडीयन (अनार्य) संस्कृती अस्तित्वात होती. ती संस्कृती म्हणजेच माणसा सोबत माणुसकीने वागणारी संस्कृती. माणूसकीवर आधारित प्रत्येकाशी समतेन वागणारी संस्कृती होय. ह्या संस्कृतीचा सुवर्णकाळ सांगण्यासाठी ती संस्कृती जोपासणारी त्या काळातील माणसे आज हयात नाहीत. मात्र तर्कशात्राच्या आधारे मोहेनजोंदाडो व हडप्पा ह्या दोन सुखी व समृद्धतेने जीवन जगणाऱ्या लोकांच्या शहरातील उत्खननात सापडलेल्या अवशेषांच्या माध्यमातून द्रविडीयन संस्कृतीची ओळख निश्चित पटते, हे वास्तव नाकारता येत नाही.

मुठभर आर्यांनी या देशात प्रवेश करून भोळ्या-भाबड्या द्रविडीयन जनतेला लाचार व गुलाम बनविले त्यांचें सुसंस्कृत राज्य कपटाने स्वतःच्या ताब्यात घेतले. स्वतःचे राज्य परत मिळविण्यासाठी त्यावेळेच्या द्रविडीयन राज्यकर्त्यांनी संघर्ष सुरू केला. गोंडांचे चंद्रपुरचे राज्य, महादेव कोळ्याचे जव्हारचे राज्य, भिल्लांचे खानदेशाचे राज्य अशी कितीतरी राज्ये आदिवासींच्या ताब्यात नव्हे तर मालकीची होती. परंतू कपटी आर्यांनी विश्वास घात करून ती हिसकावून घेतली. येथूनच आर्य-अनार्य संघर्ष पेटला. त्यात अत्याधुनिक शस्त्रांचा धाक दाखवून आर्यांनी द्रविडांची पळता भुई थोडी केली आणि त्यांना दूर जंगलात पिटाळून लावले. तेव्हा पासून आदिवासींनी जो जंगलाचा आश्रय घेतला तो कायमचाच.

या देशाचा खरा वारसदार, खरा मालक जंगलात, दऱ्या-खोऱ्यात, पहाडी मुलकात किड्या व मुंग्या पेक्षाही हीन व दीन जीवन जगू लागला. पोटाची खळगी भरण्याच्या नादात स्वतःच्या उत्थानाचा

विचारही त्याच्या मनात आला नाही. येवढेच काय पण स्वतःची ओळखही तो विसरत चालला होता. आर्यांनी मात्र मस्तवाल थाटात येथील गंगेच्या सुपीक प्रदेशात आपले बस्तान मांडून, काही द्रविडीयन लोकांना मजूर म्हणुन वापरून त्यांच्याकडून शेती करून घेवून आर्य ऐश आरामात जीवन जगू लागले. आज तेच या देशावर मुळ हक्क बजावत आहेत. म्हणतात ना. . ''भटाला दिली वोसरी अन् भट पाय पसरी'' अगदी तशी अवस्था द्रविडीयांची झाली.

आदिवसींचे आर्यांनी रेखाटलेले चित्रण फारच भयानक होते. रामायण, उपनिषधे, ब्राम्हण्येके या जुन्या वाड़मय ग्रंथात त्यांचे वर्णन कावळ्या पेक्षा काळे, धरतीचे पापी प्राणी, खुजे, चपट्या नाकाचे, राक्षस, नरभक्ष्यक, लुटारू व पिशाच्च अशा उपहासात्मक व हीन लेखणाऱ्या शब्दांनी केलेले आढळते. अशा आदिमा विषयी साहजिकच लोकांमध्ये गैरसमज पसरले होते. आदिवासी बद्दलची सहानुभूतीच सर्व सामान्य माणसाच्या मनातून नष्ट झाली होती. रामायणाच्या पहिल्या श्लोकाची निमिर्ती करणारा महाकवी वाल्मिकी हे देखील आदिवासीच होते. मात्र त्यांनी आपल्या लिखाणात कुठेही आदिवासीची दखल घेतलेली दिसत नाही. उलट आदिवासींना त्यांनी 'निषाद' म्हणूनच हिणविले आहे. व्यास हे मत्सगंधा ह्या आदिवासी स्त्री पासून जन्माला आले आणि 'व्यासोधिष्टतम् जगत् सर्वोम्' म्हणजे संपूर्ण जगाला सामावून घेणाऱ्या व्यासांनी आदिवासींना अंधारात का बरे ठेवावे ? हा खरा संशोधनाचा विषय आहे.

आदिवासीत्तेर लेखकांनी आदिवासी साहित्य विपुल प्रमाणात लिहील्याचे दिसून येते. परंतू त्यांच्या कडून आदिवासींना क्वचित कुठेतरी तोंडी लावण्याचा प्रयत्न झाल्याचे पहावयास मिळते. ते ही बिभत्स, रोमॅनटिंक व विद्रूप स्वरूपातच. त्यांच्या संस्कृतीचे व बोली भाषेचे कुठेही उल्लेख आढळत नाहीत. आदिवासींनी विदर्भ, खानदेश व पश्चिम महाराष्ट्रात अनेक वर्ष राज्य केले. परंतू त्यांच्या राज्याचा इतिहास कोणीही लिहिलेला दिसत नाही. तर तो अभ्यासक्रमात लावण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. एकंदरीत सर्वांनीच आदिवासींना डावलण्याचा जाणून बुजून प्रयत्न केलेला दिसून येतो.

भारताच्या स्वतंत्र लढ्यात या समाजातील अनेक क्रांतीकारकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. आपल्या समाजासाठी व मायभूमीसाठी जे बरबाद झाले असे वीर व वीरांगणा म्हणजे स्वातंत्र्याचा पहिला उद्-घोष करणारा क्रांतीकारी बिरसा मुंडा, स्वातंत्र्य संग्रामाचा पहिला सेनानी बाबा तिलका माझी, राजा केरळ वर्मा पद्मसी, क्रांतीकारी रामजी भांगरे व रामा किरवा, वीरगंगा नारायण, वीर राघोजी भांगरे, कुंवरसिंह वसावा, सिदो, कान्हू, चाँद व भैरो, भिमा नायक, गड मंडाल्याचा शंकर शहा, क्रांतीवीर नारायणसिंह उईके, शहीद बाबुराव शेडमाके. वीर होनाजी कंगले, सेनापती खाजा नाईक, वीर तंट्या भिल्ल, जीतु संताळ, वीर तेजा भिल्ल, स्वातंत्र्य सेनानी राणी गायडी नलु, दशरीबेन इत्यादी होत.

हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या छ.शिवरायांच्या फौजेतील अनेक लढवय्ये वीर हे महादेव कोळी, भिल्ल, कातकरी, ठाकर होते पण त्यांची साधी निशाणी ही सापडत नाही. इ.स. 1637 च्या सुमारास 'महादेव कोळी जमातीच्या बंदोबस्तासाठी सैन्य पाठवावे' असा उल्लेख ऐतिहासिक कागदपत्रात मिळतो. शिवाजी महाराजांच्या आधि जुन्नर प्रांताखालील बहुतेक डोंगरी किल्यांचे अधिपत्य महादेव कोळी जमातीच्या नायकाकडे असल्याचे पुरावे मिळतात. एवढेच काय पण ज्या वेळी सिंहगड जिंकला त्यावेळी गडाच्या बारा दरवाज्यावर

बारा बारा महादेव कोळी रखवालदार होते, असे तत्कालीन शाहीर भानुदास व अज्ञानदास यांच्या पोवाड्यातून स्पष्ठ होते. अनेक आदिवासी वीर मर्दांनी हा किल्ला कुडीत प्राण असे पर्यंत लढविला. पण इतिहासाने त्याची कुठेही नोंद घेतलेली दिसत नाही. याचे उत्तर ही तितकेच सोपे आहे. ते म्हणजे ज्यांच्या हाती लेखणी होती व ज्यांच्या हाती आज मिडीया आहे अशांनी आपल्या सोई नुसार साहित्य आणि इतिहास रंगविल्याचे दिसून येते.

आदिवासी जीवनामध्ये जशा नैसर्गीक व सांस्कृतिक प्रेरणा आहेत तशा ऐतिहासीक प्रेरणा आहेत. इतिहासामध्ये अनेक थोर वीर आदिवासी पुरूष होवून गेले. या वीर पुरूषांचे कर्तृत्व देखील आदिवासी साहित्याची महत्वाची प्रेरणा आहे. देशातील अनेक भागात आदिवासीचे राजवंश होते. त्यांचा पराक्रम आणि त्यांचे राजकीय कर्तृत्व प्रेरणादायी आहे. त्या पैकी जननायक बिरसा मुंडा हे एक होत. बिरसा मुंडा सारख्या क्रांतीकारकांनी आदिवासींच्या अस्तित्वासाठी आणि अस्मितेसाठी ब्रिटिशांशी दिलेला लढा ही सुध्दा आजच्या आदिवासी साहित्याची प्रमुख प्रेरणा आहे. या प्राचीन व मध्ययुगीन संघर्षाच्या इतिहासातूनच आदिवासी जमातीच्या वर्तमान आत्म - सन्मानाच्या चळवळी उदयास आलेल्या आहेत.

बिरसा मुंडा हे एक महान आदिवासी क्रांतीकारक होते. ब्रिटिशांच्या राजवटी विरूध्द लढणारे ते एक खंदे योध्दे होते. त्यांचा जन्म इ.स. 1875 साली झारखंड मध्ये झाला. स्वातंत्र्य लढ्यात त्यांचे योगदान अतूल अशा स्वरूपाचे आहे. अत्यंत तेजस्वी, बुध्दीमान आणि लढवय्या असलेला हा योध्दा खऱ्या अर्थाने क्रांतीकारक होता. बिरसा मुंडा जरी आज आपल्यात हयात नसले तरी आदिवासी जन मानसात त्यांच्या बद्दल प्रचंड आदर आहे. कवी भुजंग मेश्राम यांनी **बिरसा मुंडा** या कवितेत नायक बिरसाचे चित्रण रेखाटले आहे. कवीला जाणवते आहे की, आदिवासी समाज आज देखील बिरसाची वाट पहात आहे. म्हणून भुजंग मेश्राम बिरसाचे वर्णन करताना म्हणतात की,

***'लोक तुझीच वाट पहात आहेत.***
***ज्या खडतर वाटेन तु निघुन गेलास ती पायवाट,***
***आजचा राजमार्ग झालाय, तुझ्या आठवणी सारखा. . .***
***नागड्या रात्री दहशतीचे साम्राज्य असतानाही***
***असंख्य तारखा सह चंद्र असावा तसा . . .***
***आईच्या मोळी बाजारात, तेंदू पानाच्या खळ्यावर,***
***व्याजात गेलेल्या शेतावर, मजुरीच्या बटवड्यावर,***
***बस्तुरच्या गोटूलवर, इंदरवलीच्या बाजारात,***
***चंद्रपूरच्या आरण्यात, तुच दिसतोच रे आमच्या सोबत.***
***सांग तुला विसरावं तरी कसं' ?***

कवीचे बिरसा मुंडा या क्रांतीकारकाशी अत्यंत भावनिक नाते आहे. बिरसाच्या कर्तृत्वाने सर्व आदिवासींची छाती अभिमानाने भरून येते. बिरसाने पुकारलेले उलगुलान हे आंदोलन असो किंवा त्यांनी केलेल्या विविध सामाजिक आणि राजकीय स्वरूपाच्या चळवळी असोत, या सर्व घटना अत्यंत अर्थपूर्ण आणि संस्मरणीय अशा आहेत. कारण बिरसाने ब्रिटीशांच्या विरोधात चळवळी तर उभारल्याच, पण त्याच बरोबर तत्कालीन सरंमजामदारी व्यवस्थेविरूध्द बंडही पुकारले होते.

आदिवासी समाज हा आदिम काळा पासून जंगलचा राजा आहे. निसर्ग आणि एकूणच पर्यावरण त्यांच्या जगण्याचा भाग आहे. त्यांचे संपूर्ण जीवन निसर्गावरच अवलंबून आहे. मात्र ब्रिटीशांच्या काळात आणि तथाकथित सरंजामदारांमुळे आदिवासी समुहाची सर्व दृष्टीने वाताहत झाली. आदिवासींची अव्हेलना वाढत गेली, त्यांचा संघर्ष वाढत गेला. जाती व्यवस्था, वर्ण व्यवस्था, धर्म व्यवस्था इत्यादी सर्वांनी

आदिवासींचे शोषण केले. अभिजन आणि बहुजन अशा व्यवस्थेमुळे आदिवासी जनता हैरान झाली. याचा फायदा परकियांनी घेतला. मुस्लिमांची आक्रमने असोत किंवा युरोपीयन मिशनरीज असोत, परकीय वसाहतवाद असो किंवा व्यापारी असोत या सर्व घटनांनी अदिवासींच्या नैसर्गिक जगण्यावर बंधने आणली. आणि यातून राष्ट्रप्रेमी आदिवासीनी बंडाचा झेंडा रोवला व बिरसा मुंडा या चळवळीचा नेता झाला. कवी पुढे लिहीतो. . .

***'मी कधी कधी जेव्हा आश्रम शाळेत जातो,***
***मुले विचारतात, काका बिरसा मुंडा कुठे राहतो ?***
***मला सांगता येत नाही त्यांच्या स्वप्नाळू भाषेत उत्तर***
***तेव्हा मी बयान टाळणारा आरोपी होतो. . .'***

बिरसा मुंडा यांनी 1895 पासून उलगुलान चळवळ उभी केली. ब्रिटीशांच्या विरोधा बरोबरच तत्कालीन शोषण करणाऱ्या व्यवस्थेलाही प्रचंड विरोध केला. त्याने आदिवासीचे संघटन करून त्यांचे नेतृत्व केले. या उठावाच्या चळवळीत नव्या सुधारणावादी धर्माचा अंगीकार केला. ब्राम्हणी व्यवस्थेला पशूहत्या, अंधश्रध्दा या बरोबरच खोटे बोलणे, चोरी करणे, हत्या करणे या सर्व गोष्टींना त्यांनी विरोध केला. सतत परिश्रम करा, एकजुटीने रहा, आनंदाने जीवन जगा, सर्वांवर प्रेम करा असा उपदेश त्याने केला. जमीनदार व भांडवलदार यांच्या विरोधात मोठे आंदोलन उभारले. इंग्रजांना केलेल्या विरोधामुळे बिरसा मुंडा अनेकदा तुरूंगात गेला पण तो तसूभर ही मागे हटला नाही.

**बिरसा** या कवितेत बाबाराव मडावी यांनी आदिवासीच्या स्वातंत्र्यासाठी बिरसाने विद्रोह करून माणसांचा मुक्ती लढा उभा केल्याचे चित्रित केले आहे. झारखंडच्या आदिवासी लोकांच्या स्वातंत्र्यासाठी बिरसा मुंडाने फार मोठा लढा दिला. हा लढा आदिवासी लोकांवर होणाऱ्या अन्याय व अत्याचारा विरूध्द होता. आदिवासी समाजात असंख्य अंधश्रध्दा व चालीरिती होत्या. त्याचा फायदा उच्चवर्णीय लोक घेत असत. बिरसाने या रूढी, चालीरिती व अंधश्रध्दे विरोधात जन-जागृती निमार्ण केली. जहागीरदार व जमिनदार हे आदिवासी लोकांच्या जमिनीवर कब्जा करून त्यांनाच त्यांच्या शेतात वेठबिगार, गुलाम म्हणून राबवून घेत असत. त्या विरूध्द बिरसाने लोकांचे संघटन करून त्यांना जागृत केले. त्याचे वर्णन कवीने असे केले आहे. . .

***'बिरसा प्रत्येक दगडावर, तुझेच नांव***
***शोधतो तुझे जंगलातील गांव, तडफडणाऱ्या जीवांचे हे रान,***
***पुन्हा एकदा उलगुलान. . '***

इंग्रज सरकार विरूध्दचा लढा बिरसा मुंडा याने उलगुलान चळवळीतून केला. उलगुलान म्हणजे उठाव. इंग्रजांनी आदिवासी लोकांच्या उपजिवीकेवर जंगल संरक्षण कायदा अंतर्गत अनेक बंधने आणली. इतका अतोनात छळ सहन करणाऱ्या आदिवासी समाजास एकत्र आणण्याचे व संघर्ष करण्यास प्रवृत्त करण्याचे महान कार्य बिरसा मुंडाने केले. म्हणून कवी बाबाराव मडावी म्हणतो. . .

***'तु पेटवलास, जंगलात गुलाम झालेल्या माणसांचा महासंग्राम'***

थोडक्यात बिरसा मुंडा याने गुलाम बनलेल्या आदिवासी समाजास स्वावलंबन व स्वाभिमानासाठी एकजूट केले. सावकार, जमिनदार, ख्रिश्चन फादरी व इंग्रजावर हल्ले करून त्यांना सळो की पळो करून सोडले. शेतावरील गुलाम म्हणुन काम करणाऱ्या लोकांना वेठबिगारीतून मुक्त केले.

डुंबारी बुरूजावर दोन हजारापेक्षा जास्त लोकांना एकत्र करून इंग्रजा विरूध्द लढण्याचे धाडस बिरसा मुंडानी दाखविले. इंग्रजांच्या गोळीबारा मध्ये

तीर-कमान चालविणारे दोनशेहून अधिक आदिवासींचे बळी गेले तरीही आदिवासी मागे हटले नाहीत. एकंदरीत बिरसा मुंडाचा हा लढा केवळ आदिवासींचे स्वातंत्र्य, स्वाभिमान, स्वावलंबन व उत्कर्षासाठी होता. म्हणून बिरसा मुंडा हा महान आदिवासी क्रांतीकारक ठरतो. आज बिरसा मुंडाचे नसणे आदिवासी समाजाला खुप वेदनादायी वाटते कारण काळ बदलला तरी व्यवस्था मात्र बदलली नाही. इंग्रज देश सोडून गेले असले तरी स्वकियांनीच आदिवासींना लुबाडले आहे. या पार्श्वभुमीवर आदिवासीला आजही बिरसा मुंडाची उणीव भासते. म्हणून कवी म्हणतो. .

***'खरंच आम्हांला घाई झाली म्हटलं तरी चालेल***
***परंतु संस्कृती करणालाच आमचा नकार आहे***
***खोऱ्यांचा उच्यारासारखा बिरसा***
***तु कुठून ही, केंव्हा ही उगव रे !'***

आदिवासींचा इतिहास हजारो क्रांतीकारकांच्या रक्ताने मंडीत झालेला असून, त्यांनी केलेला त्याग, तपश्चर्या, वैराग्य, राष्ट्रभक्ती या सर्व गुण संपन्नतेची सुवर्ण अक्षरांनी नोंद घेण्यासारखी परिस्थिती असताना इतिहासानेही कानडोळा करावा ही खेदाचीच बाब म्हणावी लागेल. भारत देशाला स्वातंत्र्य मिळून 78 वर्ष पुर्ण झाली आहेत. संपुर्ण भारतभर विखुरलेले आदिवासी जनसमूह ज्याला सर्वोच्च न्यायालयाने या देशाचा 'खरा मालक', 'मुळ निवासी' असल्याचे मान्य केले आहे. तरीही आदिवासींची आज काय अवस्था आहे ? हे न विचारलेले बरे ! आज विकासाच्या सर्व प्रक्रियेत सर्वात शेवटचा माणूस जर कोण असेल तर तो या देशाचा मुळ आदिवासी समाज होय. आजही तो त्याच डोंगर-दऱ्यात, कड्या-कपारीत, जंगलात व दलदलीच्या ठिकाणी रहातो आहे. जिथे दळणावळणाची व सुविधाची कोणतीच साधने नाहीत, ही एक या लोकशाही असणाऱ्या देशात फार मोठी शोकांतीका आहे.

**संदर्भ ग्रंथः**

1. डॉ. विनायक तुमराम - आदिवासी साहित्य - स्वरूप व समीक्षा.
2. डॉ. प्रमोद मुनघाटे – आदिवासी मराठी साहित्य - स्वरूप व समस्या.
3. भूजंग मेसराम - आदिवासी कविता - बिरसा मुंडा (उलगुलान)
4. बाबाराव मडावी - बिरसा (पाखरं).